: प्रकरण पहिले :

# मराठी ग्रामीण कथेची वाटचाल

## : प्रकरण पहिले :

## " मराठी ग्रामीण कथेची वाटचाल"

उद्धव ज. शेळके यांचया कथेचे स्वरूप ध्यानात घेण्यासाठी प्रथमतः ग्रामीण साहित्याचे स्वरूप व वैशिष्टये लक्षात घेणे आवश्यक आहे. मराठी साहित्यात ग्रामीण कथा विपुल आणि सातत्याने लिहिली गेली आहे. उद्धव ज. शेळके हे एक महत्त्वाचे ग्रामीण कथालेखक आहेत. त्यांच्या 'शिळान अधिक आठ कथा", "वानगी" आणि "कडूनिंबाची सावली" या तीन कथासंग्रहाच्या अनुरोधाने उद्धव ज. शेळके यांचया कथा साहित्याचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेत करावयाचा आहे. त्याची पार्श्वभूमी स्पष्ट व्हावी म्हणून मराठी ग्रामीण कथेच्या वाटचालीतील उद्धव ज. शेळके यांचे स्थान किंवा योगदान निश्चित करता यावे म्हणून या प्रबंधिकेच्या पहिल्या प्रकरणात 'मराटी ग्रामीण कथेची वाटचाल" अभ्यासावयाची आहे.

सामान्यतः १९४५ नंतर मराठी साहित्यात ग्रामीण आणि नागर असा स्पष्ट भेद जाणवू लागला. ग्रामीण वाड्.मय आपली खास वैशिष्टये घेऊन या सुमारास प्रकट होऊ लागले. या काळातील ग्रामीण साहित्याचा धागा अगदी हरिभाऊ आपटे यांच्यामार्फत नेऊन भिडविता आला तरी हरिभाऊंच्या काळात ग्रामीण साहित्याची वेगळी प्रेरणा दिसत नाही. १९२० नंतर बदलेल्या परिस्थितीत खेडयांचे भारतीय जीवनातील स्थान जाणवू लागले. खेडयातील जीवनाकडे पाहण्याची दृष्टी गांधीजींच्यामुळे बदलली. साहित्यिकांची दृष्टीही खेडयाकडे वळली.

ग्रामीण आणि नागर हा भेद कसा ठरवायचा? लोकसंख्येचया विचारावरून तो ठरविणे योग्य ठरेल असे नव्हे. शहरामध्ये संस्कृतीच्या विभिन्न पातळया दिसतात. याउलट सर्वसाधारणपणे एकजिनसी संस्कृती ही ग्रामीण जीवनात आढळते.

**ग्रामीण नागर भेद :-**

समाजामध्ये वेगवेगळे सामाजिक स्तर असतात. ग्रामीण जीवनातील विविध स्तर मान्य करूनही त्यांचे प्राणभूत सूत्र एकच असल्याचे आढळते. भारतातील तीन चतुर्थांश समाज हा खेडयात राहतो व तो सांस्कृतिक दुष्टया भिन्न भिन्न पातळयावर जगतो. सांस्कृतिक फरकामुळेच ग्रामीण आणि नागर असा भेद करावा लागतो. ग्रामीण संस्कृती ही तुलनेने स्थिर असते. ग्रामीण आचार विचारात सहसा लवकर फरक पडत नाहीत. भारतातील एकूण खेडयाचे स्वरूप हे बरेचसे पारंपारिक अशा स्वरूपाचे दिसते. याच खेडयांचे स्वरूप चित्रण मराठी ग्रामीण कथांतून झालेले दिसते. १९२० नंतर बदललेल्या राजकीय आणि सामाजिक जाणिवामुळे सुरूवातीच्या काळात ग्रामीण साहित्य प्रादेशिक साहित्य या नावानेही प्रकट होते. प्रादेशिक वाड्.मय म्हणजे एखादया प्रदेशातील लोकजीवन तेथील संस्कृती त्या प्रदेशाशी निगडित असल्याने त्या संदर्भात निर्माण झालेल्या काही समस्या काही जीवन संकेत व रीती यांचे व तेथील लोकांच्या समूहाचे ज्या वाड्.मयात त्या प्रदेशातील जीवनाचे चित्रण अपेक्षित असल्याने स्वाभाविकच लोकसमूहाचे चित्रण त्यात अटळ होऊन बसते. ते काहीसे प्रातिनिधिक असावे अशी अपेक्षा असते. या प्रादेशिक वाड्.मयात त्या प्रदेशातील शहरी जीवनाचे चित्रण येऊ नये अशीही नकळत अपेक्षा असते. वास्तविक प्रादेशिक म्हंटल्यानंतर त्या प्रदेशातील सर्व काही असा अर्थ अभिप्रेत असतो. पण वाड्.मयाच्या संदर्भात प्रस्तुत शब्द वापरताना त्या प्रदेशातील ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन असा अर्थ अभिप्रेत असतो. म्हणून प्रादेशिक वाड्.मय एका अर्थी ग्रामीण वाड्.मयच असते.

**ग्रामीणता आणि प्रादेशिकता :-**

प्रादेशिक आणि ग्रामीण या दोन संज्ञाच्या अर्थामध्ये काही एक समानता असली तरी त्यामध्ये भेदही आहे. म्हणून प्रारंभी तो लक्षात घेऊन शब्द वापराची रुढी बघितली तर असे दिसते की "प्रादेशिक" हे विशेषण कादंबरीला लावले जाते व "ग्रामीण" हे विशेषण कथेला लावले जाते. प्रादेशिक साहित्यात विशिष्ट प्रदेशातील निसर्ग, भौतिक

स्थिती, सांस्कृतिक परंपरा, लोकजीवनाची पद्धती इत्यादींचे चित्रण विशेषत्याने असावे अशी अपेक्षा असते. ही अपेक्षा जीवनाचे विस्तृत चित्रण करणारा कादंबरीसारखा वाड्.मय प्रकारच पुरवू शकतो म्हणून गो.नी.दांडेकर, श्री.ना.पेंडसे यांच्या कादंब-याना प्रादेशिक कादंब-या असे संबोधले जाते. तर व्यंकटेश माडगूळकर, उद्धव ज.शेळके, शंकर पाटील यांच्या कथांना मात्र ग्रामीण असे संबोधले जाते. एखादया विशिष्ट प्रदेशातील एखादया गावातील व्यक्तींचे चित्रण केले तरी ती कथा ग्रामीण होऊ शकते. प्रादेशिक वैशिष्टयाचे चित्रण न करतानाही खेडेगावातील सामाजिक वैशिष्टयाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली व्यक्तीच्या जीवनावरील कथा ही ग्रामीण होऊ शकते. ग्रामीणतेत महत्व असते ते ग्रामीण जीवनाच्या रहाटीला. हया रहाटीत राहण्याचे चित्रण एखादया कथेत केले तर तिला आपण ग्रामीण कथा म्हणू शकतो. कथेला मात्र प्रादेशिक हे विशेषण आपण लावीत नाही. ग्रामीण कथा ही एका अर्थाने प्रादेशिक साहित्याचा भाग असली तरी या दोहोमधील हा फरक ध्यानात घ्यावा लागतो.

मात्र अस्सल ग्रामीण कथा व्हावयाची असेल तर ती अस्सल ग्रामीण जीवनावरच आधारलेली असावयास पाहिजे. तकलुपी वा वरकरणी ग्रामीण तपशीलाचे चित्रण करणारी कथा चांगली ग्रामीण कथा होणार नाही. तेव्हा चांगली ग्रामीण कथा कोणत्या वैशिष्टयानी सिद्ध होते ते पाहू. या संदर्भात गो.मा.पवार यांनी केलेले विवेचन महत्वाचे वाटते ते लिहितात, "अस्सल ग्रामीणत्व आणि त्यामुळे निर्माण होणारी कलात्मकता या संदर्भात ग्रामीण संवेदनशीलतेचा विचार मांडणे आवश्यक वाटते एखादया लेखकाच्या लेखनास वैशिष्टय प्राप्त होते ते त्याच्या व्यक्तिमत्वामुळेच. हा लेखक कोणत्या वातावरणात वाढतो, कोणते संस्कार ग्रहण करतो यावर त्याच्या व्यक्तिमत्वाची घडण अवलंबून असते. त्याचे व्यक्तिमत्व कसे आहे यावरच त्याची अनुभव घेण्याची क्षमता व धाटणी ठरत असते. अनुभव घेण्याच्या या त्याच्या क्षमतेला व धाटणीला आपण लेखकाची संवेदनशीलता म्हणतो. जो लेखक ग्रामीण जीवनात वाढला असेल, घडला असेल, ज्याने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केला असेल त्याची संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता म्हणता येईल." (१) गो.मा.पवार यांनी संवेदनशीलतेच्या अनुषंगाने ग्रामीण साहित्याचे निकष देवून ग्रामीण साहित्याच्या वेगळेपणाचे

विवेचन केलेले आहे. कारण ग्रामीण संवेदनशीलता वेगळी मानणे गैर नाही असे वाटते. कारण भारतीय आणि महाराष्ट्रीय म्हणून असलेल्या समान गोष्टी जमेस धरून सुद्धा आपल्याला म्हणावे लागेल की खेडयातील जीवनपद्धती आणि शहरी जीवनपद्धती यामध्ये फार मोठी तफावत आहे. या जीवनपद्धतीचा मने घडवण्यावर, संवेदनशीलता तयार होण्यावर मूलभूत स्वरूपाचा परिणाम होऊ शकतो.

वरील विवेचनावरून ग्रामीण आणि शहरी जीवनपद्धतीचे स्वरूप स्पष्ट होते आणि सामाजिक जाणिवेने एकत्र राहणे जीवन व्यतीत करणे ही सामाजिकता हाच ग्रामीण जीवनाचा महत्वाचा विशेष आहे. हे निष्पन्न होते. ग्रामीण जीवनाला प्राणभूत असणा-या सामाजिकतेचे चित्रण उद्धव ज.शेळके यांच्या कथा साहित्यात प्रभावीपणे येते हे त्यांचे ग्रामीण लेखक म्हणून फार मोठे योगदान आहे. त्यांचे हे वेगळेपण्ण तपशीलाने लक्षात घेण्याच्या आधी त्यांच्या पूर्वीच्या ग्रामीण लेखनाची वैशिष्टये थोडक्यात ध्यानात घेऊ.

**उद्धव ज. शेळके पूर्व ग्रामीण कथा :-**

१८७४ ते १८९० हा मराठी वाड्.मय इतिहासातील संक्रमण अवस्थेचा काळ. याच काळात मराठी कथा अद्भुततेची कात टाकून ती समाजाच्या विविध अंगाचे वास्तव दर्शन घडवू लागली. मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण त्यातून दिसू लागले. त्या काळात खेडयातील जीवनाकडे कुणाचेही लक्ष गेलेले नव्हते. पण देशाला गांधीजींचे नेतृत्व लाभले आणि त्यांच्या "खेडयाकडे चला" या आदेशामुळे सर्वांच्या बरोबर लेखकांचे लक्ष तिकडे वळले. १९२६ ते १९३५ हा काळ कथेचा अत्यंत भरभराटीचा काळ. या काळात कथेने ग्रामीण कथा, विनोदी कथा, शब्दचित्रे, लघुकथा अशी विविध रूपे धारण केली. र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ, म.भा.भोसले, हरिभाऊ आपटे, वि.स.सुखटणकर, श्री.म.माटे, व्यंकटेश माडगूळकर यांनी कथेत ग्रामीण व प्रादेशिक वातावरण चितारण्याचा प्रयत्न केला.

**हरिभाऊ आपटे :-**

आज आपणाला ग्रामीण जीवनाचे अनेकांगी दर्शन घडविणारी जी ग्रामीण कथा दिसते. तिच्या उगमाकडे जाताना हरिभाऊ आपटे यांच्या "काळ तर मोठा कठिण आला" या कथेपाशी येऊन थांबावे लागते. १८९७ मध्ये महाराष्ट्रात जो भयानक दुष्काळ पडला त्याची वृत्ते डेक्कन सभेच्या कागदामध्ये हरिभाऊंना वाचायला मिळाली त्यातील माहितीच्या आधारे "काळ तर मोठा कठिण आला" ही कथा त्यांनी लिहिली. हरिभाऊंना ग्रामीण जीवनाचा अनुभव नव्हता पण तरीही शेतकऱ्यांच्या जीवनाची झालेली वाताहात पाहून त्या करूणेपोटी हरिभाऊंनी ही कथा लिहिली. पांढरपेशा जीवनावर लिहिलेल्या कथा प्रमाणेच या कथांमागेही त्यांच्या लेखनाची प्रेरणा होती. खासकरुन ग्रामीण जीवन जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनानुभवावर ही कथा लिहिलेली नाही. दुष्काळाने शेतकऱ्यांची वाताहात कशी झाली त्याचेच चित्र त्यांनी रेखाटले आहे. ग्रामीण प्रदेश, ग्रामीण जीवन, ग्रामीण वातावरण, ग्रामीण माणूस रंगवायचा या हेतूने त्यांच्या हातून ही कथा लिहिली गेली नाही. ग्रामीण जीवनाचे चित्रण आपल्या कथातून चित्रित करावयाचे अशी त्यांची भूमिका नव्हती. आनंद यादव म्हणतात, "ही स्फूट गोष्ट एक वाङ्.मयीन अपघात वाटते. ग्रामीण जीवनाच्या खास जाणीवा घेऊन ती जन्माला आलेली नाही. केवळ आज ग्रामीण वाङ्.मयाच्या विपुलतेमुळे त्यांच्या जन्माचा शोध घेत घेत भूतकाळात जाताना ती एक खूण दिसते एवढेच" (२) तरी देखील ग्रामीण जीवनाला स्पर्श करणारी ही कथा आद्य मराठी ग्रामीण कथा मानण्यास हरकत नाही. या संदर्भात चंद्रकुमार नलगे म्हणतात, "ग्रामीण मराठी कथेची पायरी असे तिचे दर्शन आहे. तरीही तिचे महत्व नामदेवाच्या पायरीप्रमाणे आहे हे मानावेच लागेल." (३)

**वि.स.सुखटणकर :-**

खऱ्या अर्थाने पहिल्यांदा ग्रामीण जीवनाचे जाणीवपूर्वक दर्शन घडविण्याचे काम वि.स.सुखटणकरानी केले. १९२० नंतर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव वाढत गेला आतापर्यंत अस्पर्शी असलेले ग्रामीण जीवन साहित्याच्या कक्षेत आले. खेडयातील जीवनदर्शन

घडविताना सुखटणकरांनी कथेचा उपयोग प्रबोधनासाठी केला. १९३१ साली "सहयाद्रिच्या पायथ्याशी" हा आठ कथांचा संग्रह प्रसिद्ध झाला. या कथातून गोव्यातील जीवन, देवदासीची अमानुष पद्धत, गावातील हाडवैर, जीवघेणे तंटे, गरीब आणि श्रीमंत यांच्या मधील भांडणे, अंधश्रद्धेने ख्रिस्ती आणि हिंदू यांच्यातील निर्माण झालेले तणाव, शेतकरी आणि जमीनदारांच्या कुरकुरी अशा अनेक प्रवृत्तींवर प्रकाश टाकण्याचे काम सुखटण्णकरांनी केले. कथेकथेतील योगायोगाची गर्दी, कधी आदर्शाच्या अत्यंतिक टोकांचे चित्रण या कथेत येत असले तरीही आनंद यादव म्हणतात, "ग्रामीण जीवनाचा सांगाडा त्यात सापडतो आणि माणसाच्या प्रवृत्ती कळतात".(४) समाजदर्शनापेक्षाही समाज प्रबोधन हेच वि.स.सुखटणकर यांना अभिप्रेत होते असे दिसते. ग्रामीण प्रादेशिक जीवनाची व्यापक जाणीव इथे आहे. हे चटकन ध्यानात येते. ग्रामीण जीवनाचे वाङ्.मयीन भान या कथांना लाभले आहे हे जाणवते.

**श्री.म.माटे :-**

१९४१ साली श्री.म.माटे यांचा "उपेक्षितांचे अंतरंग" हा संग्रह प्रसिद्ध झाला आणि मराठी कथेला नवे धुमारे फुटले. नव्या जाणिवा पालवल्या. या संग्रहामुळे ज्याचे चित्रण अजून मराठी साहित्यात व्हायचे आहे असा फार मोठा भाग शिल्लक आहे याची जाणीव लेखकाला झाली. माटयांनी आपल्या कणखर मराठमोळया शब्दानी रांगडया ग्रामीण व्यक्तिरेखा निर्माण केल्या. ग्रामीण लोकांची भाषा, समाज सुधारकांची कणव, पांढरपेशांची जाणीव या सर्वांचा मनोहरी मिलाफ त्यांच्या कथेत पहावयास मिळतो. "उपेक्षितांचे अंतरंग" आणि 'माणुसकीचा गहिवर" या दोन कथासंग्रहाच्या नावावरुन त्यांच्या कथांची नस आपल्याला कळते. दलितात, उपेक्षितात, समाजातील खालच्या थरात मिसळून त्यांचे जीवन त्यांची सुखदुःखे, त्यांचे दारिद्रय, त्यांच्या समस्या त्यानी मानवतेने समजून घेतल्या होत्या. या समाजसेवेच्या व्रतातून आलेल्या खोलवरच्या प्रखर अनुभवातून त्यांची कथा अवतरली आहे. जे दिसले पाहिले तेच वास्तव त्यानी आपल्या कथातून मांडले आहे. खालच्या स्तरातील व्यथा वेदनानी जगणारा माणूस त्यांचे बदलेले मन त्यांनी ग्रामीण साहित्यात उभे केले आहे.

यापूर्वी बहिरंगावर आत्मतुष्ट असलेली ग्रामीण कथा अंतरंग दर्शनाने कसदार बनली आहे. ग्रामीण जीवनातील रांगडेपणा, साधेपणा, हजरजबाबीपणा, जिद्द या सर्व गोष्टी त्यानी प्रथम ग्रामीण कथेत आणल्या यांच्या लिखाणातून कळत नकळत स्फूर्ती घेऊनच इतर ग्रामीण कथा लेखक या क्षेत्रात उतरले म्हणूनच आनंद यादव म्हणतात, "माटयांच्या कथेचा कस मोठा. जीवनाची अर्थपूर्णता पाहण्याची कुवत प्रतिभावंताची म्हणूनच त्यांच्याकडे ग्रामीण कथेचे जनकत्व जाते." (५)

श्री.म.माटे यांचा पिंड समाजसुधारकांचा होता. माटे यांनी रंगविलेला तारळखो-यातील पि-या तालेवाराने हुलीवर घातल्याने खूनही करावयास तयार होतो गळयातील कंठी आणि मुंडासे यांच्या मोबदल्यात त्याला भोगावा लागतो तो रानावनातील वनवास, पि-याची एकनिष्ठ आणि मायाळू चंद्री त्याच्यासाठी डोंगरकपारीत माग काढून त्याला भाकरी पोहचविते. पण हाच पि-या आपण पकडले जाऊ याची भिती न बाळगता खंडोबाच्या जत्रेला जातो. त्याची श्रद्धा खंडोबावर आहे. त्याला पकडायला आलेल्या नायकालाही तो सहिसलामत त्यांच्या लेकराबाळात सोडतो. माटयांना ही माणसे चो-या, दरोडे का घालतात याचे समाजशास्त्रीय विश्लेषण द्यावेसे वाटत नाही. पण ही सुद्धा माणसेच आहेत. ती अशिक्षित रांगडी असतील, तरीही मायाळू आणि श्रद्धावान आहेत हेच दाखवून दिले आहे. माटयांचा अनाथ बन्सीधर, काहीही न बोलता फक्त सोसणारी व्रतस्थ सावित्री, डोळयासमोर हातचे पीक चालले म्हणून आकांत करणारा भिवा, संभाजी, गंगाराम, राम भरोशी ही माणसे जिवंत होऊनच आपल्यासमोर उभी राहतात. त्यांच्या मनातील खळबळ आपणाला जाणवू लागतो. माटयांची ही माणसे ख-या अर्थाने मराठमोळी वाटतात. माटयांच्या शैलीचाही उल्लेख गंगाधर गाडगीळ यांनी केला आहे, "ती मराठमोळी आहे हे वळण तुम्हाला जून्या काळात "वाईकर भटजी" च्या लेखनात आढळते." (६) सामाजिकतेच्या चित्रणाचा विचार करता माटे खूपच यशस्वी झाले आहेत असेच म्हणावेसे वाटते.

**ग.ल.ठोकळ :-**

१९४०-४५ या काळात ग्रामीण साहित्याला दोन दिशा लाभल्या. एक

वास्तववादी व दुसरी मनोरंजनवादी. मनोरंजनासाठी नवा बदल हीच ठोकळांची लेखन प्रेरणा असलेली दिसून येते. भावभावना मराठी ग्रामीण कथेत ठोकळांनी आणलेल्या दिसतात. त्यामुळे त्यांच्या बऱ्याच कथातून ग्रामजीवन दर्शन बाजूला पडलेले दिसते. ठोकळांची ग्रामीण कथा वास्तवाच्या पातळीवर वावरताना दिसत नाही याचे पहिले कारण असे की, त्या काळच्या कथा वाड्.मयात रुढ असलेल्या संकेताचे ओझे त्यांना दूर करता आले नाही. वातावरणाची पार्श्वभूमी बदलून तोच कथा विषय त्यांच्या कथातून पुन्हा चित्रित झाला. दुसरे कारण असे की, ठोकळ हे वृतीने कवी असल्यामुळे कथेतसुद्धा काव्यात्मवृती आली उदा. "नीट नाकासमोर जा" या कथेत गणू मास्तर आणि शेवंता यांना अशाच काव्यात्मकतेने ते रंगवितात. त्यांनी आपल्या कथेत काही गाणी घातलेली आहेत. हा प्रयत्न अभिनव असला तरी त्यामुळे कथेत कृत्रिमता वाढलेली दिसते. वास्तवतेपेक्षा अद्‌भूतता, व्यक्तिपेक्षा घटना, अर्थपूर्णतेपेक्षा कल्पनाजन्य काव्यमयता, नाटयपूर्णत, याचे त्यांना आकर्षण होते. ठोकळानी आपली कथा ग्रामीण जीवनदर्शना पेक्षा मनोरंजनाला महत्व देवून लिहिली. "नीट नाकासमोर जा" या कथेतही हे जाणवते. जीवबा, शेवंता आणि गणूमास्तर हा प्रेमाचा सांकेतिक त्रिकोण केवळ ग्रामीण म्हणून आपल्यासमोर मांडला. जिवबा मेलेला नाही, हे माहीत असूनही गणूमास्तर शेवंताशी लग्न करण्याचे ठरवितो आणि पुण्यात लग्नाचे कपडे आणायला गेल्यानंतर जिवबा जिवंत आहे, हे त्याला रेडिओवरील बातम्यावरून कळते मग शेवंताशी लग्न करण्याचा त्याचा बेत रहित होतो. या भावानुभवाच्या रेखाटनात योगायोग येतात. त्यामुळे गणूमास्तरच्या मनातील नाटय परिणामकारक ठरत नाही. ठोकळांच्या कथेतील हे हरघडी येणारे योगायोग कृत्रिम बनतात. आनंद यादव म्हणतात, "त्यामुळे मनोरंजकतेच्या दृष्टीने त्यांची कथा प्रभावी झाली असली तरी ग्रामीणतेच्या दृष्टीने ती फिकी होते."(७) ठोकळांची ही कथा रोमँटिक होत गेली. आनंद यादव म्हणतात, "या सर्वांच्या आराधनेत वास्तवातील ग्रामीणता हरवून तिचा फक्त ग्रामीणाचे काहीही ज्ञान नसलेल्या मध्यमवर्गीय वाचकासाठी आभास ठरला."(८) सामाजिकतेच्या अंगाने जीवनदर्शन घडविण्याचा विचारही ठोकळांच्या कथेने केलेला दिसत नाही.

**र.वा.दिघे :-**

ग.ल.ठोकळांच्या समकालीन लेखक म्हणजे र.वा.दिघे होय. सहयाद्रिच्या कुशीतल्या समुद्रकिना-यावरील कोकणाचे चित्रण त्यानी घडविले. त्याचा "वादळ" हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. दिघ्यांचा कल काव्यमयता, अद्भूतरम्यता, चमत्कृती याकडे असल्यामुळे त्यांच्या कथेत वास्तवाचे अधिष्ठान कमी दिसते. परंतू रंजक कथात्मक काव्यात्मवृती आणि सकस भाषा या गुणामुळे दिघ्यांची ग्रामीण कथा लक्ष वेधून घेते. त्यांच्या काव्यमय भाषेचा प्रत्यय त्यांच्या "पहिले बक्षिस" या कथेतून येते. दिघे यानी आपल्या कथेतून लोकगीते, ओव्या व इतर कवितांचाही उपयोग केला. जीवनाच्या गांभीर्यापेक्षा हलके फुलकेपणाकडे त्यांचा कल अधिक होता. सामाजिक वास्तवाचे चित्रण करण्यापेक्षा त्यांची कथा अद्भूततेत रमताना दिसते. रंजनप्रधानतेचे अवगुंठन असलेली दिघ्यांची कथा ग्रामीण जीवनाच्या सुक्ष्म पापुद्रपानात हात घालू शकली नाही.

**म.भा.भोसले :-**

खेडयात राहून केवळ हौसेने व अंतःप्रेरणेने लेखन करणा-या म.भा.भोसले यांच्या कथेत निर्मळ आदर्शाच्या संदर्भाने मोजक्या पात्राद्वारे ग्रामीण जीवनाचे सुटसुटीत रेखाटन केले आहे. ग्रामीण जीवनातील लहानसहान समस्यांची मांडणी सुशिक्षितांची जाणीव ही भोसल्यांच्या कथांची प्रमुख वैशिष्टये होत. त्यांचे लेखन पारंपारिक पद्धतीचे, सरधोपट, एकपदरी, व्यक्तीचित्रणे असणारे आहे. यांचे दर्शन "अहेव लेण", "नांदाय जाते" या कथातून मानवी मनाचे विविध धागे सुटे करून सांगण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीमध्ये नसल्यामुळे दीर्घकाळ लेखन करूनही मराठी ग्रामीण कथा वाङ्.मयात ते आपला ठसा उमटवू शकले नाहीत.

**व्यंकटेश माडगूळकर :-**

१९४५ च्या सुमारास मराठी कथेमध्ये महत्वपूर्ण परिवर्तन घडले व नवकथा उदयास आली. ग्रामीण कथेतही मूल्यात्मक फरक झाला. ग्रामीण कथेला आशयाच्या

अभिव्यक्तीच्या अंगाने समृद्ध करण्याचे काम व्यंकटेश माडगूळकरानी पहिल्यांदाच केले. ग्रामीण जीवनाचा भरपूर अनुभव आणि दैवदत्त कलात्मक जाणीव यामुळे त्यांच्या कथा या खऱ्या अर्थाने माणसांच्या जिवंत कथा ठरल्या.

"माणदेशी माणसं", "गावाकडच्या गोष्टी", "हस्ताचा पाऊस", "उंबरठा" या त्यांच्या कथासंग्रहातून त्यांनी रखरखता दुष्काळी माणदेश उभा केला. गेल्या कित्येक शतकामध्ये उपेक्षित असणारे हे ग्रामजीवन त्यांनी फार सहजपणे तरीही सखोलपणे मांडले. "माडगूळकरांची कथा प्रदर्शनीच वाऱ्यावर डोलणाऱ्या एखादया रानफुलांच्या ताटव्यासारखी वाटते" असे सांगून प्रल्हाद वडेर म्हणतात, "माडगूळकरांची कथा म्हणजे केवळ राहवले नाही म्हणून झालेला तो एक उत्स्फूर्त अविष्कार वाटावा इतकी त्यातली सहजता मनाला भिडते आणि त्यातच त्यांच्या कथेचा नवेपणा, वेगळेपणा आहे. ग्रामीण जीवनाचे अकृत्रिम चित्रण त्यानीच प्रथम केले. त्यांच्या पूर्वीचा काळच असा होता की त्यावेळच्या साऱ्याच लेखकाना कसे सांगावयाचे हे माहित होते फक्त त्यांच्याजवळ सांगण्यासारख फार थोडे होते."(९)

माणदेशातील खुळी, भोळी, कावेबाज, हरहुन्नरी, खुनशी, मायाळू, मातीवर प्रेम करणारी, कष्टाळू, जाणती आणि तालेवार अशा अनेक प्रकारच्या माणसांचे संमेलन म्हणजेच माडगूळकरांच्या कथा होय. माडगूळकरानी दोन दृष्टीनी वाङ्.मयीन ऐतिहासीक कार्यही केले. हे सांगताना गो.मा.पवार म्हणतात, "माडगूळकरानी प्राधान्यानी संवादासाठी ग्रामीण व निवेदनासाठी नागर मराठी अशी भाषा वापरली. हे कार्य माडगूळकरानी अत्यंत कौशल्याने व जबाबदारपणे केले. ग्रामीण भाषेचा मराठी वाचकाना हळूहळू सराव दिला. निवेदनातही काही ग्रामीण शब्द वापरून नागर वाचकाची ही भाषा समजून घेण्याची कुवत वाढविली व नागरभाषा व ग्रामीणभाषा यांच्यामध्ये सेतू बांधून एकंदरीत मराठी भाषा समृद्ध करण्याचे अपूर्व काम केले. नागरभाषेच्या दडपणातून पूढच्या पिढीतल्या लेखकाना मुक्त केले."(१०)

माणदेशाच्या कथा वाचत असताना आपण त्या कथामधील पात्राबरोबरच चालत असल्याचा भास होत राहतो. "बाजाराची वाट" सारख्या कथा वाचल्यानंतर या कथेत

ग्रामीण वास्तवता आणि सूक्ष्म नाटय एकत्र आल्याचे जाणवते. संकेत, श्रद्धा, परंपरा यांना चिकटून राहणारा ग्रामीण समाज फार समजूतदारपणे उभा केला. म.द.हातकणंगलेकरांनी म्हंटल्याप्रमाणे, "त्यानी मराठी ग्रामीण कथेचे आद्य व अभिजात पीठ स्थापन केले".(११) माडगूळकरांच्या पूर्वीच्या कथेतील अद्‌भूतता याना वर्ज्य करण्याचे काम या कथेने केले आणि ग्रामीण कथेला नवकथेच्या शेजारी आणून बसवले. कथारचनेचे जूने संकेत आणि तंत्र फेकून दिले. निवेदनाच्या विविध शैलीचा प्रत्यय आणून दिला. उपदेशाला पूर्णपणे वगळून अनुभवाकडे अत्यंत संयमाने पहायला शिकविले. माडगूळकरांनी कथा वास्तववादी केली. समाजाकडे विविध अंगाने पाहून त्यातले वास्तव माडगूळकरांनी चित्रित केले. समाजातील कोणताही घटक त्यानी आपल्या समाज चित्रणात दुर्लक्षिला नाही. त्यांच्या कथेत महार, मांग, कुणबी, मराठा, मुसलमान, ब्राहमण एवढेच नव्हे तर रामोशी, दरवेशी अशी सर्व सामाजिक स्तरातील माणसे वावरताना दिसतात. थोडक्यात पूढच्या ग्रामीण कथाकाराना घडविणारे माडगूळकर हे एक जंक्शन ठरले आहे.

**उद्धव ज.शेळके :-**

मराठी ग्रामीण कथेत माडगूळकर, पाटील, मिरासदार यांचा प्रभाव मोठया प्रमाणात दिसतो. या तीन कथाकाराबरोबर चौथा आणि महत्वाचा कथाकार म्हणजे विदर्भातील उद्धव ज.शेळके होय. शेळके यांच्या कथांचा प्रामुख्याने तीन कथासंग्रहाचा चिकित्सिक अभ्यास सविस्तरपणे या प्रबंधिकेत करावयाचा आहे. त्याचबरोबर उद्धव ज.शेळके यांचे जीवन आणि साहित्य, शेळके यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, त्यांचा साहित्य प्रवास याचाही परिचय करून घ्यावयाचा आहे.

उद्धव जयकृष्ण शेळके यांचा जन्म १९३१ साली विदर्भातील हिंगणघाट येथे आजोळी झाला. उद्धव ज.शेळके यानी विदर्भातील ग्रामजीवनाचे चित्रण केले. या मातीत अत्यंत दरिद्री अवस्थेत राहणारी, वेदनामय जीवन जगणारी ही माणसे शिक्षणापासून खूप दूर आहेत. परंपरेने पदरात टाकलेले सनातन दुःखच ते वागवित आहेत. दारिद्रियातही

कमालीची सोशिक असणारी ही माणसे त्यांच्याच बोलीभाषेत आपली दुःखे सांगताना दिसतात. कोणत्याही विचारसरणीचा चष्मा न घालता शेळके यानी अपेक्षित पीडित व दरिद्री माणसाच्या व्यथाना वाणी दिली. त्यांनी आपल्या विदर्भातील परिसराचे हुबेहुब दर्शन व सामाजिक दृष्ट्या सखोल चित्रण कथेमध्ये घडविले आहे.

उद्धव ज.शेळके यांच्या आयुष्याचा प्रारंभ हिंगणघाटला झाला. अमरावतीला त्यांचे वडिल शिंप्याचा व्यवसाय करीत होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण हिंगणघाटला झाले. शिक्षण घेताना त्याना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. शेळक्यांच्या घरच्या लोकांनाच मूळात शिक्षणाविषयी आस्था नव्हती. शाळेमध्ये असतानाच बरोबरचे विद्यार्थी कोणत्या ना कोणत्या कलेत बक्षिसे मिळवायचे पण परिस्थितीमुळे उद्धव ज.शेळके याना स्वतःतले वेगळेपण दाखविण्याची संधी मिळत नव्हती. त्यांचा स्वभाव सतत काहीतरी धडपड करण्याचा. पण त्यांची ही धडपड कुठेच सार्थकी लागत नव्हती. त्यामुळे ते बेचैन असत. या बेचैनेतून एक दिवस त्यांनी शाळेला रामराम ठोकला. शिक्षण संपल्यावर ते एका छापखान्यात कामाला लागले तिथे असताना अमरावतीच्या दोघा शिक्षकाकडे नृत्य आणि संगीत शिकण्याचा प्रयत्न केला. पण नौकरीपायी तेही जमले नाही. मग एक दिवस ते सरळ मुंबईला पळून गेले. बडया शहरात एखादी नोकरी मिळवून मनाजोगे काही करता येईल असे त्यांना वाटले. पण काहीही जमले नाही. तीन महिने त्यांनी बेकारी अनुभवली. जवळच्या पैशात कसे तरी भागवले. शेवटी अमरावतीला परत जाण्याचा त्यांनी निर्णय घेतला तिथे गेल्यावर पुन्हा एका छापखान्यात त्यांचा एक मित्र शामराव टोकेकर होता. त्याला वाचनाचे वेड होते. त्याच्यामुळे उद्धव ज.शेळके यानाही वाचनाची आवड लागली जे मिळाले ते अधाशासारखे ते वाचू लागले.

उद्धव ज.शेळके यांच्या वडिलांचे मित्र पेंटिंग काम करीत. ते नेहमी त्यांच्या घरी येत. त्यांना पाहून शेळकेंना वाटले आपणही पेंटर व्हावे. आणि वडिलांची इच्छा नसतानाही ते त्यांच्या मित्राबरोबर मोझरीला गेले. पेंटींग बरोबर लिखाणाचीही आवड

होती. एक दिवस शेळके यानी त्यांना काहीतरी लिहिताना पाहिले. नंतर त्यानी शेळकेंना "भिकारी" नावाची कथा वाचून दाखविली. उद्धव ज.शेळकेंनाही ती फार आवडली आणि आपणही अशी एखादी कथा लिहून पहावी असे त्यांना वाटू लागले. ज्याला पैसा लागत नाही, फारशी मेहनत लागत नाही, वेळ लागत नाही असे लेखन करून आपले "मी" पण दाखविता आले तर बघावे असे त्यांच्या मनाने घेतले. त्यांच्यातील लेखकाचे बीज नेमके याचवेळी रोवले गेले.

**लेखनास प्रारंभ :-**

सुरूवातीला उद्धव ज.शेळके यांनी मुलांसाठी कथा लिहिल्या. त्यावेळी "बालसखा", "ज्ञानसागर" वगैरे मासिकात त्या कथा प्रसिद्ध होत गेल्या. "यशवंत" मध्ये जेव्हा त्यांची कथा प्रसिद्ध झाली आणि संपादक गो.ना.पाध्ये यानी पत्र पाठवून त्याना प्रोत्साहन दिले तेव्हा आपण लेखक आहोत असे प्रथमच त्याना वाटू लागले. "स्वराज्य", "गावकरी", "तरूणभारत" यामध्येही ते लिहित होते. परंतू १९५६ साली "सत्यकथे" मध्ये जेंव्हा त्यांची गाव ही कथा प्रसिद्ध झाली तेव्हा शेळके यांचा लेखक म्हणून बोलबाला झाला. त्यावेळी सत्यकथेत लेखन छापून येणेही मोठेपणाची बाब मानली जात होती. १९६३ पर्यंत ते "सत्यकथेत" लिहित होते.

उद्धव ज.शेळके यांच्या "शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहाला राज्यपारितोषिक मिळाले. "सत्यकथे"च्या चांगुलपणाचा शोध लागण्या अगोदर शेळके यांच्या "प्रसाद", "सुदर्शन" मध्ये लिहिलेल्या कथांना बक्षिस मिळाले. महाराष्ट्र कलोपासक मंडळ, पुणे इथूनही नाटकाच्या नावे एक छोटे बक्षिस त्याना मिळाले. लेखकाबरोबर ते प्रकाशकही होऊ लागले. जीवनात लिखाणाइतके मला दुसरे काहीही प्रिय नाही. मला मिळतील तेवढे जन्म मी लेखक व्हायला घालवेन, असे उद्धव ज.शेळके म्हणत.

उद्धव ज. शेळके यांनी निरीक्षणासाठी म्हणून खूप जग पाहिले. मात्र

खेडयातले खेडे वजा मोहल्यातले कडूगोड गुणधर्म त्यांच्यात कायमचे राहिले. एक प्रकारचा रासवटपणा त्याना नेहमीच चिकटला. कदाचित या स्वभावामुळे त्यांचे मित्रमंडळ फारसे मोठे नव्हते. तथापि "कोलते", "मधुकर केचे", "दिवाणजी", "इंदिराबाई कुलकर्णी", "शरदचंद्र सिन्हा", "शामराव टोकेकर" यांच्याकडे लहर लागली की ते जाऊन बसत. इकडल्या तिकडल्या गप्पा होत आणि संध्याकाळ होणाच्या आत ते परत आपल्या घरी येत. एरवी रेडिओ ऐकणे, वाचन, लिखान याखेरोज ते काहीही करत नसत परंतू त्यात ते उमरखय्याम सारखे खूष असत.

शरदचंद्र चटर्जींच्या कादंब-या वाचल्यामुळे त्यांच्या मनात खळबळ निर्माण झाली. काहीतरी लिहावे असे त्यांना वाटू लागले. कारण त्यावेळी शेळके जे जीवन जगत होते ते जीवन, वातावरण त्यांना असहय होत होते. मिळवित असलेल्या पैशात भागत नव्हते. त्यासाठी कथालेखनाचा मार्ग त्यांनी स्वीकारला.

उद्धव ज.शेळके यांच्या साठीच्या निमित्ताने जो गौरवअंक निघाला. त्यामध्ये "माय" या कथेबद्दल मधुकर केचे म्हणतात, "माय ही कथा शेळके यांनी अतिशय घरगुती किंवा साध्या भाषेत लिहिली आहे. एक गरीब झुंजणारी, फाटक्या कपडयातील "माय" उभी झाली तीही मान्यवरांच्या लेखनाच्या पंगतीत. व-हाडच्या मातीतून माणदेशी माणसाच्या तोडीचं काही लिहिलं जाऊ शकतं ते शेळक्यांनी दांडेकरानंतर काही वर्षांनी सिद्ध केलं. या लेखकाने "माय" कथेमध्ये केलेल्या लेखनाप्रमाणे त्याच जिव्हाळयाने जग पाहिले आहे आणि भोगलेले आहे. याचा पुरावा त्यातील वाक्यावाक्यातून होतो. नशीबाने दारिद्र्यमय जीवन ज्याच्यावर जन्मताच लादले आहे, अपयश, अवहेलना या वातावरणात जो गुरफटला आहे. असाच माणूस असे लेखन लिहावयाचे या जिद्दीने शेळके लिहित होते." (१२)

"माय" या कथेतील "माय" काम न करता बसून खाणा-या "बा"शी कधी सरळ बोलत नाही पण स्वतः जीवापाड श्रम करून पोराबाळासह ती "बा"लाही सांभाळते.

कामावर जाताना एका भाकरीचे चार तुकडे ठेवते तीन तुकडे मुलांना व चौथा तुकडा "बा"साठी असतो. घरासाठी खस्ता खाणारी ही 'माय' कथा वाचून झाल्यावरही वाचकाच्या डोळयापुढे तरंगत राहते एवढी ती मनावर ठसते. "माय" या कथेमध्ये आई आपल्या अर्धपोटी तर कधी उपाशी राहणाऱ्या मुलांना म्हणते, "काही मागून खायचं नाही मी आल्यावर कोणतीबी बोंब झाली तर एकेकाच्या पाठीचं सालपट लोबवीन". सदवर्तनाच्या गोष्टी साधारणतः पोट भरल्यानंतर सुचत असतात परंतु येथे मात्र उपाशी असल्यानंतरही प्रामाणिकपणाचे संस्कार आई करते.

उद्धव ज.शेळके यांना ग्रामीण जीवनाचे, तेथील चालीरीतीचे, वृतीप्रवृती, गावगाडा आणि एकूणच समाजजीवन यांची चांगली जाण आहे. जुन्या ग्राम व्यवस्थेत खेडयात एखादा गुन्हा, अपराध घडला, भांडणतंटा उभा राहिला तर तो गावच्या पाटलाकडे नेऊन दाद मागण्याची पद्धती होती. पाटील म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या स्वभाववृत्तीवर ते बरेचसे अवलंबून होते. म्हणून बऱ्याचदा गरीबांना तर न्याय मिळेलच, त्यांची योग्य दखल घेतली जाईलच याची शाश्वती नव्हती. शेळक्यांच्या लिखाणातून ग्रामीण दरिद्रीजीवनाची अशी विविध दुःखे अभिव्यक्त होतात.

उद्धव ज.शेळके यांच्या कथामधील जाणिवा जशा ग्रामीण आहेत. तशीच त्यांची भाषा ग्रामीण आहे. या वऱ्हाडी बोलीतील संवादाला जुळेल अशीच भाषा निवेदनासाठी ते वापरतात त्यातून त्या माणसाची ग्रामीणता व्यक्त होते.

**शंकर पाटील :-**

सुरूवातीला व्यंकटेश माडगूळकरांच्याच पावलावर पाऊल टाकून शंकर पाटलांनी कथा लेखनाचा आरंभ केला. असे असले तरी या अनुकरणातून त्यांची कथा लवकर मुक्त झाली आणि माणसाच्या अंतरंगाच्या दर्शनावर भर देऊ लागली. मनोविश्लेषण करणाऱ्या कथा 'वळीव', 'ऊन', 'भेटीगाठी' या संग्रहामध्ये वाचावयास मिळतात. शंकर पाटील

यांनी प्रामुख्याने स्त्रियांच्या जीवनाचा कोंडमारा मनोविश्लेषणाच्या अंगाने चित्रित केला. माणसांच्या कथा त्यांनी लिहिल्या. पण त्याहीपेक्षा ते लक्षात राहतात ते कुटुंब कथालेखक म्हणून.

"आभाळ", "वेणा", "भार" यांसारख्या कथातून त्यानी स्त्रियांच्या दुःखाचे चित्रण चांगले केले आहे. शंकर पाटील यांच्या बहुतेक गंभीर कथा स्त्रियांच्या दुःखासंबंधी आहेत. त्यांच्यात सोसणे कमी व आकांत अधिक आहे. तर माडगूळकरांच्या कथातील दुःखे ही पुरूषांची आहेत. या विषय विभिन्नतेमुळे कथांच्या संयमात व गहिरेपणातही भिन्नता निर्माण झाली आहे. पाटलांच्या कथेला अविष्कार पद्धतीत व भाषाशैलीत काही नवी वैशिष्ट्ये मात्र आली. ही शैली आत्ममग्न स्वगत किंवा स्वगीतासारखी झाली. स्वतःच्या दुःखाची कर्मकहाणी स्वतःच आळवल्यासारखी गा-हाणे झुलत झुलत मांडण्यासारखी निवेदनाची शैली तयार झाली.

खेडयातील जीवनापेक्षा खेडयातील माणसाच्या मनाचा विचार त्यांनी अधिक केला हे ही ग्रामीण कथेला नवीनच होते. चंद्रकांत बांदिवडेकरानी खंत व्यक्त केली आहे की, "ग्रामीण जीवनातील बाहय स्थित्यंतराचा व त्यामुळे ढवळून जाणा-या ग्रामीण मनाचा वेध पुरेशा व्यापकपणे पाटील घेऊ शकले नाहीत असे वाटते आणि ज्याचे कारण त्यांनी स्वतःच सांगितल्याप्रमाणे ते बालपणीचे विश्व रसरसून जगले तेवढेच ते व्यक्त करतात असे वाटते आणि माणसा माणसतल्या विविध संबंधाचे तळकोपरे त्यांच्या लक्षात येत नाहीत. म्हणून पाटलांच्या कथात मानवी संबंधातील क्रौर्य, हिस्त्रता, शोषण फारसे झाले नाही".(१३) सामाजिकतेच्या दृष्टीने विचार करताही त्यानी समाजापेक्षाही व्यक्ती आणि त्यांच्या मनाचा गुंता हाच अधिक प्रमाणात व्यक्त केला. पाटील व्यापक अर्थाने सामाजिकतेला स्पर्श करू शकले नाही.

**द.मा.मिरासदार :-**

माडगूळकरांनी 'गावकडची माणसे' आणली तर मिरासदारानी "गावकडच्या

हकीकती' कधी अतिशयोक्ती करून तर कधी भडकपणा व गडदपणा आणून मोठया खुमासदार पद्धतीने सांगितल्या ग्रामजीवनात अदृश्यपणे वावरणाऱ्या विनोदाचा धागा मोठया कौशल्याने मिरासदारानी जीवनातील विसंगतीवर प्रामुख्याने बोट ठेवले. ग्रामीण घटनांचा, प्रसंगाचा व माणसाचा विनोदाच्या अंगाने उपयोग करून विलक्षण लोकप्रियता मिळवली. विनोदी किस्से वापरून मराठी ग्रामीण कथेला वेगळी दिशा दाखविण्याचा मान द.मा.मिरासदाराकडे जातो. शुद्ध मराठी विनोदी कथा द.मा.मिरासदारानीच लिहिली. स्वभावातील विसंगती ही विनोदाला कारण ठरते. 'व्यंकूची शिकवणी', 'माझ्या बापाची पेंड' इ. कथासंग्रहातून द.मा.मिरासदारानी विनोदी रंजनवादी ग्रामीण कथा लिहिली. परंतु केवळ विनोदाच्या प्रेरणेच लेखन केल्याने त्यांच्या कथा लेखनाला काही मर्यादा पडलेल्या दिसतात.

माडगूळकर, शंकर पाटील, द.मा.मिरासदार या तिघांच्या कथा विषयी अभिप्राय व्यक्त करताना चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "माडगूळकर, पाटील, मिरासदार या तिघांच्या कलात्मकतेबद्दल अभिमान वाटण्यासारखे पुष्कळ असले तरी या कथातून जीवन जगण्यासाठी हेतुपूर्वक संघर्ष करणाऱ्या ग्रामीण जनतेचा व त्यांच्या संघर्षाचा अनेक अंगानी धारदार अनुभव येत नाही मानवी जीवनाबद्दल पुष्कळ सहानुभूती असलेल्या त्यांच्या कथा काहीशा सुखवस्तू मनाने लिहिलेल्या वाटतात. त्यांच्यातील वेदना अस्सल असली तरी त्यात गुंतलेपणा पेक्षा तटस्थेचा भाग अधिक आहे असे वाटते त्यात वेदनेचा व्यापकपणा जाणवत नाही. या पार्श्वभूमीवर आनंद यादव, सखा कलाल, रा.र.बोराडे, चारूता सागर, महादेव मोरे, उद्धव ज.शेळके यांची कथा १९५५ नंतर लिहिली गेली."(१४)

**आनंद यादव :-**

१९६३ पासून आनंद यादव सातत्याने लेखन करीत आहेत. त्यांनी कथालेखनाला प्रारंभ केला तेव्हा त्यांची बरीचशी काव्यरचना झालेली होती. कवीप्रवृत्तीचे ग्रामीण कथाकार असा त्यांचा पिंड बनला आहे. "मातीखालची माती", "खळाळ", "डवरणी" या कथासंग्रहातून यादवानी ग्रामीण शेतमजूरांची दुःख रंगविण्याचा प्रयत्न केला

आहे. खेडयात राबणा-याविषयीची तळमळ, दारिद्रयामुळे अन्नालाही महाग झालेल्या लोकांची भावनिक ओढाताण, त्यामुळे निर्माण झालेला ताणतणाव, शेतकऱ्यांच्या जीवनात येणारी नैसर्गिक व मानवनिर्मित संकटे, यांत्रिकीकरणामुळे झालेला भावनिक कोंडमारा यामुळे यादवांची कथा सकस बनत गेली. त्यांनी तिला कलात्मकतेची जोड देण्याचा प्रयत्न केला. "प्रणयातील नवथरपणा' त्यातले कोमेजलेपण, प्राण्यापक्षावरील आंतरिक माया, जगण्याची धडपड यांच्या दर्शनाने वाचकही सुखावून जावा अशा कथा यादवांनी लिहिल्या. त्यानी प्रयत्नपूर्वक बोलीभाषेचा वापर केला त्यामुळे कथेच्या जिवंतपणाला आणखी बळ मिळाले. म.द.हातकणंगलेकरांनी यादवांच्या भाषा शैलीबाबत म्हंटले आहे की, "यादवांचा "खळाळ" हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आणि त्यातील "मोट", "धुण" यासारख्या कथातील भाषेच्या सुरावटीने मन हर्षभरीत झाले. त्यातल्या थंडगार खळाळत्या लावण्याने मनात पालवी फुटली. त्यांच्या या कथात खेडयातील जीवनाचे व्याकूळ आकलन दिसते. या आकलनाला कथारूप देताना सुरावटीच्या रचनेसारखी कथेची रचना करण्याचा त्यानी प्रयत्न केला आणि चिंतनशील निवेदनाची एक वेगळी बंदीश निर्माण केली. दुःखाची मूळ आर्तता ते भोगत असतानाच त्यांच्या चिंतनात वृती बुडवुन टाकल्यामुळे या आर्ततेला प्राप्त होणारे नादमय सौंदर्य या बरोबरच भाषेच्या प्रतिमांच्या सुप्त लावण्यमयतेचा चाललेला शोध यामुळे यादव ग्रामीण कथेला अविष्काराचे एक अभिनव परिमाण देवून या कथेचे एक नवे घराणे निर्माण करीत आहेत असे लोभस दृष्य काही काळ दिसेल."(१५) आनंद यादवांच्या कथेचा अभ्यास केल्यानंतर हातकणंगलेकरांचे हे मत यथार्थच आहे असे वाटते.

यादवांची कथा ही प्रामुख्याने शेतावर घडणारी कथा आहे. म्हणून शेती व्यवसायातील येणारे शब्दही लक्ष वेधून घेतात. मोट, नाडा, वाकूर, मोरक्या, पाट, हीर, खोप, माळवं, खुरपी, चिपाड इ. शब्दामधून रानाचे वातावरण सहजपणे साकारून जाते. ग्रामीण बोली वाक्प्रचार आणि म्हणी यांनी संपन्न असते. यादवांच्या कथेतून याचा प्रत्यय येतो. उदा.नांगूर फिरवणे, थुका लावणे, आगापिच्छा नसणे इ.वाक्प्रचार आढळतात. त्याचप्रमाणे देवाची करणी नि नारळात पाणी, अंगा परीस बोंगा दांडगा, इ.म्हणीही त्यांच्या कथेतून आढळतात.

बोलीतील काही शब्द ती ज्या भागात बोलली जाते. त्या भागातील मातीचा गंध घेऊन येतात. त्याच बरोबर ते शब्द विशिष्ट अर्थ घेऊन येतात ग्रामीण माणूस सुद्धा कधी कधी बोलताना सहजपणे प्रतिमांचा, उपमांचा वापर करतो. यादवांच्या कथेतून याचे प्रत्यंतर होते. यादवांची वर्णने अत्यंत चित्रमय असतात. ग्रामीण जीवनातील ताणतणावाबरोबरच त्याला अनुकूल वातावरणही यादव कथेत निर्माण करतात त्यानी रेखाटलेली व्यक्तिचित्रेही खास ग्रामीणतेचा प्रत्यय देतात. त्यांच्या गंभीर कथा अत्यंत समर्थ जाणीवांच्या कथा आहेत. खेडयातील निसर्ग, झाडेझुडपे, पिके, शेतातील हंगामानुसार ऋतुमानानुसार करावी लागणारी कामे, यांची त्याना स्वानुभवातून माहिती दिसते.

ग्रामीण दरिद्री माणसाचे दुःख त्यांची भाषा, ग्रामीण जीवनातील प्रश्न यांची त्याना जाण आहे. त्यामुळे त्यांचे ग्रामीण जीवनाचे आकलन आणि कलात्मक अभिव्यक्ती उच्च दर्जाची आहे. काहीशी बहिर्मुख असणाऱ्या ग्रामीण कथेला अंतर्मुख करण्याचा प्रयत्न यादवानी केलेला दिसतो. त्यांच्या बहुतेक कथामधून माणसांच्या मनावरच्या तणावांचे चित्रण येते. उदा. "खळाळ" संग्रहातील "वरातीचा शालू" या कथेतील विधवा "अंजना" विलक्षण काळजीत असते. कारण नागाची पूजा करायची तर थोडेसे दुध आणि लाह्यापुरते जोंधळेही तिच्या घरात नसतात. तीन महिन्यानी "कंट्रोलात तांदूळ" आला तो स्वस्त दरात मिळू लागला पण तो आणायला पैसा नसतो पोरांच्या अंगावर कपडे नीट नाहीत. निदान त्यांच्यासाठी भात तरी करावा म्हणून ती दिवसभर धडपडते. लवकर परत येण्याची शक्यता नसल्याने कुणीच तिला उसने पैसे देत नाहीत. सरूच्या सांगण्यावरून ती तिच्या मालकिणीकडे मामलेदाराच्या बायकोकडे लग्नातला वरातीचा शालू गहाण ठेवण्यासाठी जाते पण्ण ती गहाण नको म्हणते, विकत मागते. नाइलाजाने ती पन्नास रूपयास ती शालू विकते. कंट्रोलच्या दुकानापुढे तांदळासाठी लागलेल्या रांगेत उभ्या असलेल्या पोराकडे येते. तर दुकानातला तांदूळच संपलेला असतो. विषण्ण मनाने ती घरी येते. नवऱ्याच्या भूतकाळातल्या आठवणी तिला अस्वस्थ करून सोडतात "हया लुगडयात पदमिनीगत दिसतीयास तू" हे नवऱ्याचे उद्‌गार आठवतात. ती बेचैन होते, शालूचे आलेले पैसे घेऊन ती पुन्हा मामलेदाराच्या बायकोकडे जाते. पैसे

परत करून म्हणते, "बाई हे तुमच तुम्हाला पन्नास रूपये घ्या अन् माझ मला वरातीचं लुगड द्या" ती बाई कारण विचारते, "मुलबाळ उपाशी असताना हे नेऊन काय करणार? पण अंजना म्हणते, "म्हयनाभरात खाऊन जातील ते नि तेवढयात लाखमोलाच लुगड जाईल. काय तरी करीन म्हण माती खाऊन जगायला येईल घरी येऊन ती ते लुगड नेसून नव-याच्या आठवणीत गुंग होते. त्यातून बाहेर येते तेंव्हा वास्तवाच्या जाणीवेने ती पुन्हा खचू लागते. या कथेत अंजनाच्या मनावरचा दुहेरी ताण चित्रित केला आहे. एकीकडे मुलासाठी तडफडणारे आईचे हृदय आहे. तर दुसरीकडे नव-याच्या आठवणीने व्याकूळ होणारे पत्नीचे विरही मन आहे. आनंद यादवांच्या कथांमधून ग्रामीण दुःखी माणसाच्या मनावरील ताण तणावाचे दर्शन घडते. माणसाच्या मनाचे चित्रण करताना शंकर पाटलाप्रमाणेच आनंद यादवही मनोविश्लेषणाचा वापर करतात जणू एक मन आपल्याच अंतर्मनाशी संवाद करीत असावे. अशी त्यांच्या कथांची मांडणी दिसते. या मांडणीतूनच त्या त्या व्यक्तींचे व्यक्तिमत्व व जीवनानुभव प्रकट होतात.

ग्रामीण भागात आणि समाजाच्या सर्व स्तरापर्यंत शिक्षणाचे लोण पोहचले पण त्या प्रमाणात नोक-या, उद्योग, व्यवसाय निर्माण होऊ शकले नाहीत. त्यामुळे बेकारीची समस्या किती तीव्र झाली आहे. हे "भोवळ" या कथेतून प्रत्ययाला येतेच शिवाय ग्रामीण सुशिक्षित तरूण मनाची व्यथाही या ठिकाणी अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. वासुदेव मुलाटे म्हणतात, "मानवी मनाची गुंतागुंत त्यांची आदोलने व विविध पैलू यांचे चित्रण शंकर पाटलांच्या कथेतून आलेले आहे. शंकर पाटलांच्या कथेतून ही बलस्थाने आत्मसात करून ग्रामीण कथा आणखी पुढे नेहण्याचा प्रयत्न यादवानी केला काहीशी बहिर्मूख असणारी ग्रामीण कथा अंतर्मुख करण्याचा प्रयत्न यादवानी केला."[१६] यादवांची भाषाही मनातले भाव टिपण्यासाठी लवचिक रूप धारण करते.

थोडक्यात ग्रामीण जीवनाचे सर्वांगीण आणि सम्यक दर्शन यादवांच्या कथेत घडते. त्यांनी त्या जीवनातील सूक्ष्म बारकावे टिपलेले आहेत. ग्रामीण माणसाच्या मनाचा

सखोल असा शोध घेऊन त्यांची गुंतागुंत व कल्लोळ टिपले आहेत. यादवांच्या कथेविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "ग्रामीण जीवनातल्या ढासळत्या जीवन मूल्यांचा जीवन कलहाच्या वाढत्या तिव्रतेचा ग्रामीण जीवनातील व्यवहाराचा व व्यापारांचा त्यांचा अनुभव सूक्ष्म असतो. पण कथेचे मनोविश्व साकार करताना हे सर्व वास्तव पार्श्वभूमी सारखे असते. एका परीने ग्रामीण संवेदना भावना व त्याला अनुरूप प्रतिमांची व भाषेची योजना त्यांचे विलक्षण प्रभावी रसायन यादवांच्या कथेत आढळते. ग्रामीण जीवनाची कथा व त्यांचे शोकाकुल करणारे अनुभव गहनतेचे परिणाम घेऊन येतात. आनंद यादवांच्या कथेत माडगूळकरांचे सूक्ष्म वस्तूनिष्ठ निरीक्षण आहे. शंकर पाटलांची गंभीर करूणार्ह जीवनदृष्टी आहे आणि कथेच्या केंद्रीय अनुभूतीशी प्रारंभापासून शेवटपर्यंत लयात्मक अवस्थेत राहण्याची कवी प्रवृत्ती आहे ही कथा भावकवितेसारखी अटकर बांध्याची जातीवंत ग्रामीण कथा आहे."(१७)

**रा.रं.बोराडे :-**

मराठवाडयातील लिहिणाऱ्या लेखकामध्ये ग्रामीण कथेच्या क्षेत्रात रा.रं.बोराडे यांची 'वसूली' ही कथा १९५७ साली प्रसिद्ध झाली. परंतू "पेरणी" हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९६२ साली प्रकाशित झाला. हा त्यांचा पहिला कथासंग्रह त्यानी मराठवाडयाच्या मातीस अर्पण केला आहे. मराठवाडयाच्या मातीत जन्म घेणाऱ्या या लेखकाचे आपल्या मातीवर त्या मातीतल्या माणसांवर जीवापाड प्रेम आहे. तेथल्या माणसाची मने आणि मते ते चांगली जाणतात. आपल्या "पेरणी", "ताळमेळ", "मळणी", "वानवळा" इ. कथासंग्रहातून मराठवाडयातील ग्रामीण जीवन त्यांनी रेखाटले आहे.

त्यांच्या सुरूवातीच्या काही कथावर शंकर पाटील, द.मा.मिरासदार क्वचित प्रसंगी व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांचे परिणाम जाणवत असला तरी उत्तरोत्तर त्यांच्या कथेने स्वतःचा असा एक कलापूर्ण घाट शोधलेला दिसतो. माडगूळकर, पाटील, मिरासदार यांचे त्यानी अंधानुकरण केले नाही. नव्या जाणीवा व नव्या अनुभूती याना वेगळा अविष्कार देवून त्यानी स्वतःच्या कथेचे वेगळेच विश्व साकार केले आहे.

रा.रं.बोराडे यांच्या कथेचा केंद्रबिंदू खेडयातील "स्त्री" आहे. "स्त्री" हा त्यांच्या चिंतनाचा विषय आहे. स्त्रीची विविध रूपे त्यांच्या कथेत पहावयास मिळतात. त्यांच्या ग्रामीण कथेतील स्त्री ही माता आहे. कारभारीण आहे सासुरवाशीण, भावजय, बहीण आहे. याखेरीजज आणखी कितीतरी नात्याने ती आपल्यापुढे साकार होते. रा.रं.बोराडे यांना स्त्री समजाऊन घेण्याची दुर्दम्य इच्छा आहे. म्हणूनच त्यांच्या कथांमधून डोकावणारी ही ग्रामीण स्त्री चित्रे फारच बोलकी उतरली आहे. अबोल, कष्टाळू, कर्तव्यदक्ष, निष्ठावान्, चारित्र्यवान व घरच्या सुखासाठी स्वतःला विसरलेली आहे. अशी स्त्री मनाने आणि कृतीने निर्भय आहे. कामभावना ही माणसाच्या जीवनातील मूलभूत जाणीव माणूस मग ती स्त्री असो की पुरूष असो. कामभावना त्याला अस्वस्थ करतात. ग्रामीण माणूस याला अपवाद नाही.

**सारांश :-**

१८९७ च्या दुष्काळाचे चित्रण करणारी "काळ तर मोठा कठीण आला" ही हरिभाऊंची गोष्ट ग्रामीण कथेच्या जन्माची खूण मानली जाते. शेतकऱ्यांची दुर्दशा त्यानी रंगविली. सुखटणकर सरदेसाई यांनी समाज चित्रणापेक्षाही समाजप्रबोधनासाठी कथा लिहिल्या. श्री.म.माटे यानी मात्र खऱ्या अर्थानी ही माणसांची कथा लिहिली. "उपेक्षितांचे अंतरंग" दाखविले त्यांच्यातील माणुसकी गहिवर कसा अनावर आहे याची प्रचिती आणून दिली. म्हणूनच ग्रामीण कथेचे जनकत्व त्यांच्याकडे जाते समाजातील उपेक्षित माणसांचे चित्रण करून माटयानी खरे समाजदर्शन घडविले. ठोकळ, दिघे यानी मात्र ग्रामीण रांगडेपणा बरोबरच अतिरंजकता काव्यमयता आणली. यावेळी ग्रामीण कथेचे वास्तवाशी असलेले नाते हळूहळू दुरावत गेले. घडवून आणलेल्या योगायोगांची गर्दी झाली. ग्रामीण कथा रोमँटीक झाली. म.भा.भोसले यांनाही ग्रामीण जीवनाचा अनुभव होता. त्यानी ग्रामीण तपशीलही भरले पण त्यात जिवंतपणा येऊ शकला नाही.

व्यंकटेश माडगूळकरांनी मात्र सर्वार्थाने मराठी ग्रामीण कथेला अधिक वास्तव

पातळीवर नेले आशय संपन्न कसदार कथा लिहून ग्रामीण समाजाचे सर्वांगानी चित्रण केले. माणदेशी माणसाच्या शरीराबरोबर त्यांच्या मनाचाही वेध घेतला. पुढे शंकर पाटलानी जी मनोविश्लेषणाचा रंग अधिक गडद केला त्यांची मुळे माडगूळकरांच्या लेखनात दिसतात. शंकर पाटलांच्या कुटुंबकथांनी माणसाच्या मनाचे, ताणतणावांचे चित्रण केले आहे. ग्रामीण स्त्री अधिक्याने आणि गांभीर्याने रंगविली मिरासदारानी ग्रामीण जीवनात अदृश्यपणे वावरणा-या विनोदाचा धागा मोठया कौशल्याने रंगविला. जीवनातील विसंगतीवर प्रामुख्याने बोट ठेवले. परंतु केवळ विनोदाच्या प्रेरणेने लेखन केल्याने त्यांच्या कथालेखनाला काही मर्यादा पडल्या.. आनंद यादवानी ग्रामीण कथा अधिक काव्यमय केली तिला चिंतनशील केले यादवानी प्रयत्नपूर्वक बोली भाषेचा वापर केला बोलीतून पूर्ण कथा लिहून एक वेगळा प्रयोग केला खेडयात राबणा-या विषयी तळमळ, दारिद्रयामुळे अन्नालाही महाग झालेला ताण, शेतक-यांच्या जीवनात येणारी नैसर्गिक संकटे यांत्रिकीकरणामुळे झालेला कोंडमारा यामुळे यादवांची कथा सकस बनत गेली.. यादवानी ग्रामीण जीवनातील सूक्ष्म बारकावे टिपले. काहीशी बहिर्मूख असणारी प्राममीण कथा अंतर्मुख करण्याचा प्रयत्न केला.

मराठवाडयातील ग्रामीण कथाकार रा.रं.बोराडे यानी ग्रामीण समाजातील नात्यागोत्याचे संबंध व या संबंधातून निर्माण होणारे ताण तणाव चित्रित केले. विशेषतः ग्रामीण स्त्री विविध रूपे त्यांच्या कथातून चित्रित झाली उद्धव ज.शेळके यांच्या कथासंग्रहातून विदर्भातील ग्रामीण जीवनाचे चित्रण पाहावयास मिळते या मातीत अत्यंत दरिद्री अवस्थेत राहणा-या, वेदनामय जीवन जगणारी ही माणसे शिक्षणापासूनही खूप दूर आहेत. परंपरेने पदरात टाकलेले सनातन दुःखच ते वागवित आहेत. दारिद्रयातही कमालीची शोषिक असणारी ही माणसे यांच्याच बोली भाषेत आपली दुःखे सांगताना दिसतात. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "कोणत्याही विशिष्टय विचार सरणीचा चष्मा न घालता शेळके यानी उपेक्षित, पीडित व दरिद्री माणसाच्या व्यथाना वाणी दिली."[१८]

अशा प्रकारे निरनिराळया प्रदेशातील कथाकारानी हा प्रवाह समृद्ध केला.

ग्रामीण समाजाला वाचकासमोर ठेवले. रा.रं.बोराडे आनंद यादव, उद्धव ज.शेळके, सखा कलाल, चारूता सागर यानी निष्ठेने हा प्रवाह वाहता ठेवलेला आहे. ग्रामीण बोलीतूनच कथा स्वाभाविक अंगाने प्रकट झाली. म.ना.अदवंत म्हणतात, "त्यांच्या कथातून आलेला आशय जिवंत व प्रत्ययकारी वाटू लागला. त्यांची अभिव्यक्ती पण ग्रामीण भाषेतून होऊ लागल्यामुळे ग्रामीण कथातून बोलीभाषेची विविध रूपे प्रकट होऊ लागली. भाषा समृद्ध करण्याचे फार मोठे कार्य या ग्रामीण कथांनी केले."(१९) मराठी ग्रामीण कथेचा विकास होत गेला आणि 'मराठी ग्रामीण कथेची वाटचाल' यामध्ये सातत्य टिकून राहिले. अशा प्रकारे या प्रकरणात आपण मराठी ग्रामीण कथेची वाटचाल लक्षात घेतली. त्याचप्रमाणे शेळके यांच्या कथा वाङ्.मयाचे स्वरूप जाणून घेतले. पुढील प्रकरणात "शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील कथांचे स्वरूप विवेचन करावयाचे आहे..

-o-o-o-o-

: संदर्भ सूची :


| | | |
|---|---|---|
| १) | पवार,गो.मा. | ग्रामीण संवेदनशीलता सकाळ, रविवार पुरवणी, १/८/१९८१ पृष्ठ १. |
| २) | यादव, आनंद | मातीतील मोती, कुलकर्णी ग्रंथगार पुणे, प्रथमावृती १९७०, पृष्ठ १०. |
| ३) | नलगे, चंद्रकुमार | दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, कोल्हापूर, ऑक्टो, नोव्हें,डिसें.१९९१, पृष्ठ २७. |
| ४) | यादव, आनंद | मातीतील मोती कुलकर्णी ग्रंथगार पुणे, प्रथमावृती १९७०, पृष्ठ ५. |
| ५) | यादव, आनंद | 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथमावृती १९७९, पृष्ठ १५. |
| ६) | राजाध्यक्ष, विजया | गंगाधर गाडगीळांची मुलाखत, संवाद ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ मुंबई, प्रथमावृती, २ जून १९८५ पृष्ठ १२०. |
| ७) | यादव, आनंद | मराठी ग्रामीण कथेचा स्वरूप विचार, ग्रामीण साहितय स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे-३० प्रथमावृती १ मे १९८१ पृष्ठ १६. |
| ८) | तत्रैव | पृष्ठ ३१ |
| ९) | वडेर, प्रल्हाद | कथाकार व्यंकटेश माडगूळकर, अनुभव आणि आकार, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथमावृती जुलै १९७९ पृष्ठे १२५. |
| १०) | पवार, गो.मा. | 'व्यंकटेश माडगूळकर एक अस्सल देशी माणूस' रविवार सकाळ पुणे ९ जाने १९८३. |

| | |
|---|---|
| ११) हातकणंगले, म.द. | ग्रामीण कथा, मराठी कथा रूप आणि परिसर |
| १२) शेळके, उद्धव ज. | गौरवांक, २७ नोव्हे.१९९०. |
| १३) बांदिवडेकर, चंद्रकांत | कथा मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप १९५०-७५ पॉप्यूलर प्रकाशन मुंबई १९८६ पृष्ठ १५०. |
| १४) तत्रैव | तत्रैव |
| १५) हातकणंगले म.द. | मराठी कथा रूप आणि परिसर, सुपर्ण प्रकाशन पुणे प्रथमावृती १९८६, पृष्ठ ४६. |
| १६) मुलाटे, वासुदेव | 'ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास" साहित्य प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृती १९९२, पृष्ठ ७२. |
| १७) बांदिवडेकर, चंद्रकांत | मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, पॉप्यूलर प्रकाशन मुंबई प्रथमावृती १९९२, पृष्ठ १५०. |
| १८) तत्रैव | तत्रैव |
| १९) अदवंत, म.ना. | कथा वाङ्.मय प्रदक्षिणा, कॉन्टिनेटल प्रकाशन पुणे सहावी आवृती १९७६, पृष्ठ १८९. |


-o-o-o-o-